**आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२१२/का.१४२५-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
दिनांक: ३० सप्टेंबर,२०२४

**प्रस्तावना :-** आर्य वैश्य समाज महाराष्ट्रातील एक अतिअल्पसंख्यांक समाज असून शिक्षण व उद्योग व्यवसायामध्ये रूची असलेल्या या समाजामध्ये अनेक तरुण शैक्षणिकदृष्टया विद्वत व व्यावसायिकदृष्टया हुशार आहेत. परंतु, आर्थिक पाठबळ नसल्यामुळे आर्य वैश्य समाज विविध सोयीसुविधांपासून वंचित राहतो. आर्य वैश्य समाजाचा सर्वांगीण विकास होण्याकरिता महामंडळ स्थापन करण्याची मागणी केली जात आहे. आर्य वैश्य समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सुशिक्षीत बेरोजगार तरुणांकरीता श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** आर्य वैश्य समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सुशिक्षीत बेरोजगार तरुणांकरीता शेतीपूरक व्यवसाय, विपणन, प्रक्रिया, उद्योग, पुरवठा आणि साठवणूक याचबरोबर लघू उद्योग, वाहतुक, अन्य व्यावसायिक उद्योग उपलब्ध करुन देणे किंवा त्यास अर्थसहाय्य करुन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन आर्थिक स्तर उंचावणे, यासाठी दिनांक ३० सप्टेंबर,२०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार कंपनी अधिनियम,२०१३ च्या कलम ८ अंतर्गत शासकीय हमी असलेली व भाग भांडवल नसलेली कंपनी म्हणून श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येत आहे.

२. सदर प्रस्तावित महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालीलप्रमाणे :

| **अ.क्र.** | **पद** | **पदनाम** |
|---:|---|---|
| १ | अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | उपाध्यक्ष | उपाध्यक्ष |
| ३ | वित्त विभागाचे सचिव | सदस्य |
| ४ | कौशल्य विकास,उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे सचिव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | नियोजन विभागाचे सचिव | सदस्य |
| ६ | उद्योग ,उर्जा व कामगार विभागाचे सचिव (उद्योग) | सदस्य |
| ७ | कृषि व पदुम विभागाचे सचिव (कृषि) | सदस्य |
| ८ | इतर मागास व बहुजन कल्याण विभागाचे सचिव | सदस्य |
| ९ | महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक | सदस्य सचिव |
| १० | राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | इतर ६ अशासकीय सदस्य | सदस्य |

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक हे किमान मंत्रालयीन सहसचिव दर्जाचे असतील.

३. महामंडळाचे मुख्यालय नागपूर येथे राहील.

४. महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल हे रु. ५० कोटी इतके राहील. दरवर्षी या महामंडळाच्या भागभांडवलासाठी निधीच्या उपलब्धतेनूसार तरतूद केली जाईल. तसेच प्रस्तावित महामंडळाच्या कार्यालयासाठी जागा व आवश्यकतेनुसार असलेला कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्यात येईल.

५. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९३०१४४४१७०२१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरी साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

MAHENDRA SHANTARAM PUJARI

Digitally signed by MAHENDRA SHANTARAM PUJARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, 2.5.4.20=16153bd1d85632a421d5a5fd23bf5e5bb624d27f2c8cf59fb17e3ead3a034dbc, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=404B91F6EB1B1FEEADD0E630B486F2FF22C7073CCB93D334F083CEAEFA447C09, cn=MAHENDRA SHANTARAM PUJARI
Date: 2024.10.08 16:39:48 +05'30'

**( महेंद्र.शां.पुजारी )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा .सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा .अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा .उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा .उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,

९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (गृह) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
११.मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२.मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालय, मुंबई
१३.सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
१५.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
१६.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक,
१८.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१८.सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई,
१९.महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२०.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी,
२१.वित्त विभाग (व्यय -८ / अर्थसंकल्प-१६), मंत्रालय, मुंबई,
२२.स ह सचिव / उप सचिव / अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३.निवडनस्ती, कार्यासन-१४२५-अ, नियोजन विभाग,